SPANDAN Career Institute
The way of success...
SINCE 2008

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**D**

**प्रश्नपुस्तिका क्र.**

**BOOKLET No.** **GS2022**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**

**Mob. No. 9923262977**

**Date :30/01/2022**

**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2022**


**विषय : – सामान्य अध्ययन [004]**

**पेपर क्र. (४)**

**सूचना**

१. <u>सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य</u> प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा–क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. योग्य विधान ओळखा.

अ) अनिवासी भारतीय (NRI) म्हणजे भारतात राहत नाही परंतु जिच्याकडे भारताचा पासपोर्ट आहे अशी व्यक्ती.

ब) मुळ भारतीय व्यक्ती (PIO) म्हणजे जिचे पुर्वज / जी पुर्वी भारताचा पासपोर्टधारक होती नाही अशी व्यक्ती

क) भारताचा परकीय नागरीक (OCI) म्हणजे अशी परदेशी व्यक्ती जिला भारतीय नागरिकत्व मर्यादित प्रमाणात बहाल करण्यात आले आहे.

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ  २) फक्त अ, क  ३) वरील सर्व  ४) फक्त ब, क

२. खालीलपैकी कोणती व्यक्ती राष्ट्रपतींना राजीनामा सादर करत नाही ?

पर्यायी उत्तरे

१) उपराष्ट्रपती  २) सरन्यायाधीश  ३) लोकसभा सभापती  ४) पंतप्रधान

३. ग्रामसभा वर्षातून ४ झाल्या पाहिजेत त्या सर्वसाधारणे कोणत्या दिवशी असाव्यात ?

अ) २६ जानेवारी  ब) १ मे  क) २ ऑक्टोंबर

ड) १४ नोव्हेंबर  इ) १४ एप्रिल  ई) १५ ऑगस्ट

१) अ, ब, क, ड  २) ब, क, ड, ई  ३) अ, ब, क, इ  ४) अ, ब, क, ई

४. उच्च न्यायालयाला प्राधीलेख काढण्याचा अधिकार २२६ कलमांतर्गत कोणत्या बाबतीत आहे ?

अ) मूलभूत अधिकार  ब) मूलभूत कर्तव्ये  क) कायदेशीर बाबी

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ, क  २) फक्त ब, क  ३) फक्त अ, ब  ४) वरील सर्व

५. क्षेत्रफळाचा विचार करता भारतातील लोकसभेचा सर्वात छोटा मतदार संघ कोणता ?

१) मलकाजगिरी  २) चांदणी चौक  ३) लक्ष्यव्दीप  ४) लडाख

६. शांतता, प्रगती आणि सुशासनासंदर्भात खालीलपैकी कोणत्या राज्ये/केंद्रशासित प्रदेशाबाबत नियम करण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे ?

अ) अंदमान व निकोबार बेटे  ब) लक्षव्दीप  क) दादरा व नगर हवेली

ड) दमण व दीव  इ) चंदीगड

१) अ, ब, क, ड, इ  २) अ, क, ड, इ  ३) अ, ब, क, ड  ४) ब, क, ड, इ

७. खालील कोणत्या व्यक्ती या राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत पदावर राहू शकतात ?

अ) पंतप्रधान  ब) केंद्रीय मंत्रीमंडळ  क) राज्यांचे राज्यपाल  ड) महान्यायवादी

१) अ, ब, क  २) अ, क, ड  ३) अ, ब, ड  ४) अ, ब, क, ड

८. अ) भारताचा भूप्रदेश ही संकल्पना भारत हा राज्यांचा संघ या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे

ब) भारत हा राज्यांचा संघ या व्याख्येत फक्त राज्यांचा समावेश होतो तर 'भारताचा भूप्रदेश' या व्याख्येत राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांचा समावेश होतो

१) दोन्ही विधाने योग्य, विधान ब हे विधान अ चे स्पष्टीकरण

२) दोन्ही विधाने योग्य, विधान अ हे विधान ब चे स्पष्टीकरण

३) विधान अ योग्य, विधान ब अयोग्य

४) विधान ब योग्य, विधान अ अयोग्य

९. खालीलपैकी कोणत्या कलमामध्ये वार्षिक अंदाजपत्राची तरतूद आहे ?

१) कलम ११०  २) कलम ११२  ३) कलम ११४  ४) कलम ११६

१०. खालीलपैकी कोणते कलम राष्ट्रीय आणीबाणीदरम्यान निलंबित होतात ?

अ) कलम १९  ब) कलम २०  क) कलम २१

१) अ आणि ब  २) ब आणि क  ३) क आणि अ  ४) फक्त अ

११. खालीलपैकी कोणत्या राज्यामध्ये विधानपरिषद स्थापनेबाबत तरतूद करण्यात आली मात्र सदर तरतूदीची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली नाही ?

१) आसाम  २) तमिळनाडू  ३) मध्यप्रदेश  ४) पंजाब

१२. राज्यपालाची एखादी कृती त्यांच्या स्वेच्छाधिन अधिकाराखाली येते की नाही असा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर अंतिम निर्णय देण्याचा अधिकार कोणाला असतो ?

१) राष्ट्रपती  २) राज्यपाल  ३) सर्वोच्च न्यायालय  ४) उच्च न्यायालय

www.spandancareers.org

१३. भारतीय राज्यघटनेबाबत खालील विधाने लक्षात घ्या आणि योग्य पर्याय निवडा.
अ) कायद्यासमोर समानता हा हक्क अमेरिकन घटनेवरुन घेण्यात आला आहे
ब) कायद्याने समान संरक्षण हा हक्क ब्रिटनच्या घटनेवरुन घेण्यात आला आहे
१) अ बरोबर २) ब बरोबर ३) दोन्ही चूक ४) दोन्ही बरोबर

१४. घटनेच्या कोणत्या कलमानुसार वित्त आयोगाची नेमणूक केली जाते ?
१) कलम १५० २) कलम ३८० ३) कलम १८० ४) कलम २८०

१५. खालीलपैकी कोणत्या व्यक्तींनी ख्रिश्चन धर्म स्विकारला होता ?
अ) करमरकर ब) बाबा पदमनजी क) शेषाद्री ड) पंडित रमाबाई
१) अ, ब, क २) वरील सर्व ३) शेषाद्री सोडून सर्व ४) ब व ड

१६. सरोजिनी नायडू यांच्याबद्दल खालील वाक्ये विचारात घ्या.
अ) त्या काँग्रेसच्या बेळगाव अधिवेशनाच्या अध्यक्ष होत्या ब) त्या उत्तरप्रदेशच्या राज्यपाल होत्या
१) दोन्ही विधाने चूक २) फक्त विधान ब चूक
३) दोन्ही विधाने चूक नाहीत ४) फक्त विधान अ चूक

१७. अ) काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून मुंबई गव्हर्नर लॉर्ड रे यांना निमंत्रण दिले होते
ब) पहिल्या अधिवेशनात ७२ प्रतिनिधीपैकी मुंबईचे ३८ तर पुण्याचे ९ प्रतिनिधी होते
क) पुण्यात प्लेगची साथ आल्यामुळे अधिवेशन मुंबईला घेण्याचे ठरले
१) सर्व विधाने योग्य २) विधान अ व ब बरोबर
३) विधाने ब व क योग्य ४) फक्त विधान अ बरोबर

१८. मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली यांची हत्या केली. धिंग्राच्या या कामगिरीचे कौतुक कोणत्या इंग्रजांनी केले ?
१) लॉर्ड लॉइड २) विन्स्टन चर्चिल ३) वरील दोन्ही ४) कोणीही कौतुक केले नाही

१९. अ) हैदराबाद संस्थानाची राज्यभाषा (कारभार करण्याची) फारशी होती
ब) हैदराबाद संस्थानातील शिक्षणाची भाषा उर्दू होती
१) विधान अ अयोग्य २) विधान ब अयोग्य ३) दोन्ही विधाने योग्य ४) दोन्ही विधाने अयोग्य

२०. महात्मा फुल्यांनी शिवाजीचा पोवाडा लिहिला तर महात्मा फुल्यांचा पोवाडा कोणी लिहिला ?
१) वि.रा.शिंदे २) गोपाळ गणेश आगरकर ३) मुकुंदराव पाटील ४) भास्करराव जाधव

२१. जोडया जुळवा

| घटना | वर्ष |
|---|---|
| अ) रेल्वे मंडळाची स्थापना | i) १८५३ |
| ब) पोस्ट ऑफिस कायदा | ii) १८५४ |
| क) कोलकाता – आग्रा तारसेवा | iii) १९११ |
| ड) कुर्डुवाडी – लातूर नॅरोगेज | iv) १९०५ |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | ii | i | iii |
| २) | iv | i | ii | iii |
| ३) | i | iii | ii | iv |
| ४) | iii | iv | i | ii |

२२. बॉम्बे असोसिएशन विषयी खालील विधाने विचारात घ्या आणि अयोग्य विधान / विधाने निवडा
अ) स्थापना : २६ ऑगस्ट १७५२
ब) अध्यक्ष : डॉ. भाऊ दाजी लाड
क) चिटणीस : जमशेदजी जीजाभाई
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी सर्व

२३. दांडी यात्रेत सहभागी झालेल्या अनुयायींमध्ये किती अनुयायी महाराष्ट्रीयन होते ?
१) ११ २) १२ ३) १३ ४) १४

२४. खालीलपैकी कोणाला 'मुस्लिम गोखले' बनण्याची इच्छा होती ?
१) बॅरिस्टर जीना २) मौलाना आझाद ३) सर सय्यद अहमद खान ४) कवी मोहम्मद इक्बाल

२५. कोणत्या गोलमेज परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली ?
१) पहिली २) दुसरी ३) तिसरी ४) यापैकी नाही

www.spandancareers.org

२६. पुढील विधानांचा विचार करा व सत्य विधान / विधाने ओळखा

अ) पाश्चात्यांच्या पुरोगामी व तर्कशुद्ध विचारांनी प्रभावित होऊन शिख संप्रदायाने 'सिह सभा' चळवळ स्थापन केली

ब) सिंह सभेची एक चळवळ म्हणजे 'अकाली चळवळ' ही चळवळ गुरुव्दारांना आपली पारंपरिक संपत्ती मानणाऱ्या भ्रष्ट महंताविरुध्द होती

क) अकालींनी गुरुव्दारांच्या उद्धारासाठी महंताविरुद्ध हिंसात्मक असहकार सत्याग्रह चळवळ सुरु केली

१) अ, क २) अ, ब ३) अ ४) वरील सर्व

---

२७. खालील विधानांच्या विचार करा आणि सत्य विधान ओळखा

अ) लोकमान्य टिळकांच्या विनंतीवरुन श्यामजी कृष्ण वर्मा यांनी सेनापती बापटांची आपल्या इंडिया हाऊसमध्ये राहण्याची सोय केली

ब) लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे आश्रयसीन व प्रेरणास्थान होते

क) या काळात महाराष्ट्रभर लोकमान्य टिळकवादी गुप्त संघटना स्थापन झाल्या. त्यातील आर्य बांधव समाज ही एक संघटना होय

१) अ, ब २) अ, क ३) क, ब ४) वरीलपैकी सर्व

---

२८. खालील विधानांपैकी योग्य विधान/विधाने निवडा

अ) गुजरातमधील खेडा जिल्ह्यात राजकुमार शुक्ला या स्थानिक शेतकऱ्याच्या पुढाकाराने गांधीनी 'खेडा सत्याग्रह' सुरु केला

ब) लखनौ अधिवेशनात मोहनलाल पांडया या नीळ पिकवणाऱ्या स्थानिक शेतकऱ्याने गांधीजीना आपल्यावरील अन्यायाबाबत सांगितले

१) अ २) ब ३) अ व ब ४) यापैकी नाही

---

२९. जारवा (Jarawas) आणि अँटिलीज या जमाती भारतात कोठे आढळतात ?

१) अंदमान निकोबार २) लक्षव्दीप ३) नामचा बारवा ४) मध्य भारत

---

३०. खालील स्थानिक वाऱ्यांमधून थंड वारे ओळखा

अ) चिनुक ब) मिस्ट्रल क) बोरा ड) सिरोक्को इ) खामसीन फ) पांपेरो

१) ब, क, ड २) अ, ड, इ ३) वरील सर्व ४) ब, क, फ

---

३१. हरितगृह वायुबद्दल योग्य विधाने ओळखा

अ) हरितगृह वायू (Green House gas) लघुतरंग लहरी (Short wave) शोषून घेतात

ब) हरितगृह वायू दीर्घतरंग लहरी (Long Wave) शोषून घेतात

१) अ योग्य २) ब योग्य ३) दोन्ही अयोग्य ४) दोन्ही योग्य

---

३२. खालील विधाने पहा

अ) जांभी मृदा दक्षिण कोकणात आढळते

ब) जांभी मृदा उत्तर कोकणात आढळते

क) जांभी मृदा संपुर्ण कोकणात आढळते

१) फक्त ब बरोबर २) फक्त क बरोबर ३) फक्त अ बरोबर ४) अ व क बरोबर

---

३३. हवेच्या दाबामुळे खालीलपैकी कोणत्या घटना घडून येतात ?

अ) वाऱ्यांची निर्मिती ब) वादळांची निर्मिती

क) आरोह पर्जन्याची (ascendig rain) निर्मिती ड) अवरोह पर्जन्याची (Downpour) निर्मिती

१) अ, ब, ड २) अ, क, ड ३) अ, ब, क ४) अ, ब, क, ड

---

३४. खालीलपैकी कोणत्या पिकांना भौगोलिक मानांकन मिळालेले आहे ?

अ) सिंधुदुर्गचा हापूस आंबा ब) बीडचे सीताफळ क) नागपूरची संत्री

१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी सर्व

---

३५. हिमोढगिरी, हिमोढकटक ही भूरुपे हिमनदीच्या कोणत्या कार्यातुन तयार होतात ?

अ) हिमनदीचे वहनकार्य (Carrying work) ब) हिमनदीचे संचयनकार्य (Accumulation work)

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ व ब ४) यापैकी नाही

---

३६. खालीलपैकी योग्य विधान / विधाने निवडा

अ) नाईल ही जगातील सर्वात मोठी नदी आहे

ब) ॲमेझॉन ही जगातील सर्वात लांब नदी आहे

१) विधान अ योग्य २) विधान ब योग्य ३) दोन्ही विधान सत्य ४) दोन्ही विधान असत्य

---

३७. पुढील जिल्ह्यांचा त्यांच्या निर्मिती दिनांकानुसार कालानुक्रम लावा

अ) पालघर ब) नंदुरबार क) लातूर ड) सिंधुदुर्ग

१) ड, ब, क, अ २) क, ड, ब, अ ३) ड, क, ब, अ ४) ड, अ, ब, क

---

www.spandancareers.org

३८. हिमालयाच्या दिशेबाबत खालील विधाने विचारात घ्या

| स्तंभ अ (भाग) | स्तंभ ब (दिशा) |
|---|---|
| अ) वायव्य हिमालय | i) वायव्य – आग्नेय |
| ब) दार्जीलिंग – सिक्कीम | ii) पूर्व – पश्चिम |
| क) अरुणाचल | iii) ईशान्य – नैऋत्य |

वरीलपैकी योग्य जोडी ओळखा

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) फक्त क  ४) वरीलपैकी सर्व

---

३९. महाराष्ट्राच्या सीमेबाबत खालील विधानांचा विचार करा

अ) महाराष्ट्राच्या वायव्य भागात सातमाळा डोंगररांगा, गाळणा टेकडया व सातपुडा पर्वतरांगेतील अक्राणी टेकडया आहेत

ब) महाराष्ट्राच्या उत्तरेस सातपुडा पर्वतरांगा व त्याच्या पुर्वेस गाविलगड टेकडया आहेत

क महाराष्ट्राच्या ईशान्येस दरकेसा टेकडया तसेच पूर्वेस चिरेली टेकडया, गायखुरी व भामरागड डोंगर या नैसर्गिक सिमा निर्माण करतात

ड) महाराष्ट्राच्या अतीदक्षिणेकडील पठरावर हिरण्यकेशी नदी व कोकणात तेरेखोल नदी आहे

योग्य विधान / विधाने कोणती ?

१) अ, ब, क, ड  २) अ, क, ड  ३) क, ड, ब  ४) फक्त क व ड

---

४०. अ) एकूण महासागरीय क्षेत्राच्या २०% भाग या महासागराने व्यापलेला आहे

ब) या महासागराचा जास्तीत जास्त भाग दक्षिण गोलार्धात असून काही भाग उत्तरेकडील भूभागाने सिमित होऊन कर्कवृत्ताच्या किंचित उत्तरेस पसरलेला आहे

वरील वर्णन कोणत्या महासागरासंबंधी आहे ?

१) पॅसिफिक महासागर  २) हिंदी महासागर  ३) अटलांटीक महासागर  ४) आर्क्टिक महासागर

---

४१. खालीलपैकी कोणत्या क्षेत्रात मंगल या खनिजाचा वापर केला जात नाही ?

अ) लोहपोलाद  ब) प्लास्टिक  क) काच  ड) रंग

१) अ व ब  २) क  ३) ड  ४) यापैकी नाही

---

४२. योग्य विधान / विधाने निवडा

अ) विषुववृत्ताकडून ध्रुवाकडे गेल्यास दैनिक तापमान कक्षा वाढत जाते

ब) सागरकिनाऱ्यापेक्षा खंडांतर्गत भागात दैनिक तापमान कक्ष कमी असते

क) समुद्रसपाटीपासून जसजसे उंच जावे तसतशी दैनिक तापमान कक्ष वाढत जाते

१) अ, ब, क  २) अ, क  ३) ब, क  ४) अ, ब

---

४३. खालील विधानांपैकी योग्य विधान / विधाने ओळखा

अ) सहाव्या योजनेत अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ५.५% होता

ब) आठव्या योजनेत अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ६.५% होता

क) दहाव्या योजनेत अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर ७.75 होता

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) फक्त क  ४) वरीलपैकी सर्व

---

४४. पहिले त्रैवार्षिक परकीय व्यापार धोरण कधी प्रकाशित करण्यात आले ?

१) १९८२  २) १९८५  ३) १९७९  ४) १९७६

---

४५. योग्य जोडया जुळवा

| स्तंभ अ (योजना) | स्तंभ ब (लोगो तयार करणारी व्यक्ती) |
|---|---|
| अ) प्रधानमंत्री जनधन योजना | i) राणा भौमिक |
| ब) डिजिटल इंडिया मिशन | ii) अनंत खासबागदार |
| क) स्वच्छ भारत अभियान | iii) प्रिया शर्मा |
| ड) नवीन शिक्षण धोरण | iv) नवाज शेख |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iii | iv | ii | i |
| २) | iv | iii | ii | i |
| ३) | ii | iii | iv | i |
| ४) | iii | i | ii | iv |

---

४६. खालीलपैकी योग्य विधाने दर्शवणारा पर्याय निवडा

अ) महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींच्या आरक्षणासाठी ५०% आरक्षण मर्यादा ओलांडण्यास सर्वोच्च न्यायालयाने मार्च २०२१ मध्ये मान्यता दिली

ब) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम १९६१ अंतर्गत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांमध्ये ओबीसींसाठी २७% आरक्षण देण्याची तरतूद आहे.

www.spandancareers.org

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) अ आणि ब  ४) दोन्ही अ आणि ब नाही

४७. काही आंतरराष्ट्रीय संघटनांबाबत योग्य जोडया जुळवा

| संस्था | मुख्यालय |
|---|---|
| अ) FAO | i) रोम |
| ब) UPU | ii) जिनिव्हा |
| क) WTO | iii) बर्न |
| ड) Antarcitc Treaty | iv) ब्यूनस आयर्स |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | ii | i | iii | iv |
| ३) | iii | ii | i | iv |
| ४) | i | iii | ii | iv |

४८. Interpol च्या संबंधे योग्य जोडया जुळवा

| नोटीस प्रकार | उद्दिष्ट |
|---|---|
| अ) लाल (Red) | i) बेपत्ता व्यक्तीचा शोध किंवा ओळख पटविणे |
| ब) पिवळा (Yellow) | ii) व्यक्तीचे स्थान शोधणे आणि त्यास अटक करणे |
| क) काळी (Black) | iii) अज्ञात मृतदेहाविषयी माहिती मिळवणे |
| ड) जांभळी (Purple) | iv) गुन्हेगारांची कार्यपध्दती, उपकरणे यांबाबत माहिती मिळवणे व प्रदान करणे |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iii | iv |
| २) | ii | i | iii | iv |
| ३) | iii | ii | i | iv |
| ४) | i | iii | ii | iv |

४९. जी – ७ गटाबाबत खालीलपैकी योग्य पर्याय निवडा

अ) ४७ वी जी–७ शिखर परिषद कार्बीस बे (Carbis bay) येथे पार पडली

ब) जी – ७ या औद्यागिक आणि विकसनशील देशांच्या गटाचे निश्चित असे मुख्यालय नाही

१) फक्त अ अचूक  २) फक्त ब अचूक  ३) दोन्ही अ व ब दोन्ही अचूक  ४) दोन्ही अ व ब चूक

५०. खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य नसणारे विधान / विधाने ओळखा

अ) सुक्ष्म अर्थशास्त्रामध्ये एकंदरीत संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला जातो

ब) समष्टी अर्थशास्त्रामध्ये अर्थव्यवस्थेतील लहान घटकांना वैयक्तिक पातळीवर अभ्यास केला जातो

१) दोन्ही  २) फक्त ब  ३) फक्त अ  ४) यापैकी नाही

५१. स्वातंत्र्योत्तर भारताच्या पहिला अर्थसंकल्प कोणी सादर केला ?

१) मोरारजी देसाई  २) जॉन मथाई  ३) आर.के.षण्मुखम चेट्टी  ४) एन.के.चंदा

५२. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा ?

अ) नेफ्ताली बेनेट – इस्रायल

ब) इब्राहीम रईसी – इराक

क) शेर बहादूर देऊबा – भूतान

१) फक्त अ  २) फक्त ब  ३) ब, क  ४) वरीलपैकी सर्व

५३. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास फंड कोणत्या संस्थेने सुरु केला आहे ?

१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया  २) स्टेट बँक ऑफ इंडिया  ३) प्रादेशिक ग्रामीण बँक  ४) नाबार्ड

५४. खालीलपैकी कोणत्या कालखंडामध्ये भारतामध्ये सर्वप्रथम आर्थिक सुधारणा लागू करण्यात आल्या ?

१) जनता सरकार कालखंड  २) इंदिरा गांधी कालखंड

३) राजीव गांधी कालखंड  ४) पी.व्ही. नरसिंहराव कालखंड

५५. महामंडळ कराविषयी खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य पर्याय निवडा

अ) परकीय कंपन्यांना ४०% महामंडळ कर भरावा लागतो

ब) भारतीय कंपन्याना ३०% महामंडळ कर भरावा लागतो

१) विधान अ योग्य  २) विधान ब योग्य  ३) दोन्ही विधाने योग्य  ४) दोन्ही विधाने अयोग्य

५६. पी.सी. महालनोबीस यांनी नव मार्क्सवादी प्रतिमानाची स्वतंत्र्यपणे रचना कधी केली ?

१) १९५१  २) १९५२  ३) १९५३  ४) १९५४

www.spandancareers.org

५७. खालील विधानांपैकी अयोग्य विधान/विधाने ओळखा
अ) मानवी कवटीमध्ये एकूण २२ हाडे असतात
ब) यापैकी १४ हाडे डोक्यामध्ये असतात
क) यापैकी ८ हाडे चेहऱ्यामध्ये असतात
१) अ आणि ब   २) ब आणि क   ३) अ आणि क   ४) अ, ब आणि क

---

५८. खालील परिणाम कोणत्या पोषक द्रव्याच्या अभावामुळे दिसून येतात ?
अ) अकाली पाने गळणे   ब) उशिरा फुले येणे   क) मुळांची वाढ खुटणे
१) हायड्रोजन   २) फॉस्फरस   ३) लोह   ४) झिंक

---

५९. केंद्रकाव्यतिरिक्त पेशाीच्या कोणत्या अंगकात डी.एन.ए. (DNA) असते
१) तारक केंद्र (Centriole)   २) गॉल्गीकाय (Golgi apparatus)
३) लयकारिका (Lysosome)   ४) सूत्रकणिका (Mitochondria)

---

६०. खालील विधानांचा विचार करा
अ) मृत प्राणी अथवा वनस्पती यांचेमध्ये कार्बन – १४ ते कार्बन – १२ यांचे गुणोत्तर बदलत असते
ब) किरणोत्सारी कार्बन – १४ समस्थानिकाचा वापर कार्बनी वय मापनामध्ये करतात
१) विधान (अ) सत्य आहे (ब) विधानाची कारणमिमांसा आहे
२) (अ) आणि (ब) दोन्ही विधाने चूक आहेत
३) (अ) विधान सत्य आहे परंतु (ब) चूक आहे
४) (अ) आणि (ब) एकमेकांशी संबंधित नाहीत

---

६१. योग्य पर्याय ओळखून जोडया लावा
अ) संपुष्टात न येणारी   i) मानवनिर्मिती कृत्ये
ब) स्ट्रॅटोस्फीयर   ii) जीवाश्म इंधन जसे कोळसा, पेट्रोल
क) अनुनरावर्ती/पुनर्नुनीकरणास   iii) सौर ऊर्जा
ड) क्लोरोफ्लुरोकार्बनस   iv) ओझोनचा दाट थर

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | iii | ii | i |
| २) | iv | ii | iii | i |
| ३) | iii | iv | ii | i |
| ४) | ii | iii | iv | i |

---

६२. ॲव्होगॅड्रो स्थिरांकाचे मूल्य किती आहे ?
१) $६.०२२ \times १०^{२२}$   २) $६.०२२ \times १०^{२३}$   ३) $६.०२२ \times १०^{२४}$   ४) $६.०२२ \times १०^{२५}$

---

६३. “सध्या जागतिक पातळीवर ताज्या आणि चांगल्या प्रतीच्या फुलांची मानवी आहारांत वाढत्या प्रमाणात मागणी आहे” वरील विधान निम्न निर्देशील संभाव्य उपयुक्ततेवर आधारित असून त्यापैकी एक ‘वरील विधानाच्या’ संदर्भाने संयुक्तीक नाही. संयुक्तीक नसलेले कारण ओळखा
१) फुलांमध्ये नैसर्गिकरीत्या ॲन्टीऑक्सीडंट व अपमार्जन (ज्यामध्ये क्रियाशील ऑक्सीजन अपमार्जन करण्याची क्षमता) कार्यक्षमता असते
२) फुलांमध्ये “अन्थ्योसायनीन” प्रचुर प्रमाणांत असते
३) फुल आकर्षक असून परागण प्रक्रियेत सहाय्य करतात
४) फुल महत्वाची जीवनसत्वे व खनीजांचा (मिनरल्स) स्त्रोत आहे

---

६४. खालील जोडया जुळवा (योग्य पर्याय निवडा)
अ) ॲरिस्टॉटल   i) औषधशास्त्राचा जनक
ब) थिओफ्रास्टस   ii) अनुवंशिकशास्त्राचा जनक
क) हिप्पोक्रेटस   iii) वनस्पतीशास्त्राचा जनक
ड) ग्रेगर जोहान मेंडेल   iv) जीवशास्त्राचा जनक

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | ii | i | iv | iii |
| २) | iii | ii | iv | i |
| ३) | iv | iii | I | ii |
| ४) | i | ii | iv | iii |

---

६५. जर रक्तामध्ये हिमोग्लोबिन नसते तर फुफ्फुस ते पायाची बोटे या ऑक्सीजनच्या प्रवासासाठी किती कालावधी लागला असता ?
१) ३ तास   २) ३ आठवडे   ३) ३ महिने   ४) ३ वर्षे

www.spandancareers.org

६६. व्दिकेंद्री चष्म्याविषयी पुढील विधाने विचारात घ्या
अ) वरची काच अंतर्गोल असते जी दूरदृष्टीतेसाठी असते
ब) खालची काच बर्हिवक्र असते जी निकट दृष्टीतेसाठी असते
वरील विधानांपैकी योग्य विधान/विधाने ओळखा
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही ४) यापैकी नाही

---

६७. खालीलपैकी कोणती विधान/विधाने "सारकोमेअर" बद्दल सत्य आहे / आहेत ?
अ) सारकोमेअर हे कोणत्याची तंतुचे खंड आहेत
ब) ते उतकीय संरचना आणि क्रियात्मक कार्याचे भाग आहेत
१) फक्त अ २) फक्त ब ३) अ आणि ब दोन्ही ४) वरीलपैकी कोणतेही नाही

---

६८. समपृष्ठरज्जू प्राण्यामध्ये, पेशीत आणि ऊतीतय + आयनाची संहती ......... आणि हड्डु + आयनाची संहती........ असते
१) कमी, अधिक २) कमी, कमी ३) अधिक, कमी ४) अधिक, अधिक

---

६९. शहमृगाच्या अंडयाचे आकारमान काय असते
पर्यायी उत्तरे
१) 170mm × 100mm २) 170mm × 130mm ३) 170mm × 160mm ४) 170mm × 170mm

---

७०. खालील विधानांपैकी योग्य विधान/विधाने ओळखा
अ) हवा उष्णतेचा दुर्वाहक आहे
ब) हवा विद्युतधारेचा दुर्वाहक आहे
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही ४) यापैकी नही

---

७१. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाबाबत (International Criminal Court: ICC) अचूक विधाने ओळखा ?
अ) या न्यायालयाचे मुख्यालय हेग येथे आहे
ब) भारत या न्यायालयाचा संस्थापक सदस्य आहे
क) १९९८ सालच्या रोम कायद्याव्दारे (Rome Statute) या न्यायालयाची स्थापना करण्यात आली होती
१) फक्त अ २) फक्त ब, क ३) फक्त अ, क ४) वरीलपैकी सर्व

---

७२. अलीकडे झालेल्या Regional Comprehensive Economic Partnership (RCEP) बाबत अयोग्य विधाने दर्शवणारा योग्य पर्याय निवडा ?
अ) १ जानेवारी २०२१ पासून हा करार लागू झाला आहे
ब) एकूण १५ देशांदरम्यानचा हा मुक्त व्यापार करार आहे
क) भारत या कराराचा सदस्य आहे
१) फक्त अ आणि क २) फक्त ब आणि क ३) फक्त क ४) एकही नाही

---

७३. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद अलीकडे १ महिन्यासाठी भारताकडे आले होते. तो महिना कोणता ?
१) जून २०२१ २) जुलै २०२१ ३) ऑगस्ट २०२१ ४) सप्टेंबर २०२१

---

७४. जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या (Executive Board of WHO) अध्यक्षपदी खालीलपैकी कोणाची निवड करण्यात आली होती ?
१) डॉ.सौम्या स्वामिनाथन २) डॉ.बलराम भार्गव ३) डॉ. गागनदीप कांग ४) वरीलपैकी नाही

---

७५. नाम (NAM) चळवळीबाबत खालीलपैकी अयोग्य विधाने ओळखा
अ) नाम चळवळीच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्ताने ऑक्टोबर २०२१ मध्ये सर्बियातील बेलग्रेड येथे शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले
ब) उपराष्ट्रपती वेंकय्या नायडू बेलग्रेड येथील परिषदेला उपस्थित होते
क) नाममध्ये १२० सदस्य देश आहेत
ड) १९ वी नाम शिखर परिषद युगांडामध्ये नियोजित आहे
१) अ व अ २) फक्त ब ३) क व ड ४) वरीलपैकी एकही नाही

---

७६. अलीकडे इराणने आपले चलन बदलण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या चलनाचे नाव काय आहे ?
१) रियाल (Rial) २) टोमान (Toman) ३) दिनार (Dinar) ४) दराम (Dram)

---

७७. ४ ऑगस्ट २०२० रोजी बेरुत येथे अमोनियम नायट्रेटचा स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली. बेरुत ही कोणत्या देशाची राजधानी आहे ?
१) सायप्रस २) सिरिया ३) जॉर्डन ४) लेबनॉन

---

७८. फुमिओ किशिदा यांच्याबाबत खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा ?
अ) ते जपानचे १०० वे राष्ट्रध्यक्ष ठरले आहेत
ब) ते जपानमधील लिबरल डेमॉक्रटिक पक्षाचे (LDP) नेते आहेत
अ) फक्त अ २) फक्त ब ३) एकही नाही ४) दोन्ही अ, ब

---

www.spandancareers.org

७९. कोविड – १९ महामारी काळात सार्वत्रिक निवडणूका घेणारा जगातील पहिला देश कोणता ठरला ?
१) दक्षिण कोरिया २) न्यूझीलंड ३) सिंगापूर ४) युनायटेड किंग्डम

८०. अलीकडे चर्चेत असणारे 'हागिया सोफिया' कोणत्या देशात आहे ?
१) अफगाणिस्तान २) इराण ३) तुर्की ४) अझरबैजान

८१. अमेरिकेने CAATSA अंतर्गत खालीलपैकी कोणत्या देशावर निर्बंध लादले आहेत ?
१) इराण २) भारत ३) तुर्की ४) वरीलपैकी नाही

८२. New START कराराबाबत खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा ?
अ) हा अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यानचा करार आहे
ब) हा करार पारंपरिक शस्त्रास्त्रांमधील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमन करतो आणि संघर्ष क्षेत्रांमध्ये शस्त्रास्त्रांचा प्रवाह नियंत्रित करतो
पर्यायी उत्तरे
१) फक्त अ २) फक्त ब ३) एकही नाही ४) दोन्ही अ, ब

८३. अलीकडे आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यात युध्द झाले. या दोन देशांतील विवादित प्रदेश कोणता ?
१) टायग्रे (Tigray) २) क्रिमीया (Crimea)
३) नागोर्नो–काराबाख (Nagorno-Karabakh) ४) चागोस (Chagos)

८४. अलीकडे कोविन ग्लोबल कॉन्क्लेव्हचे आयोजन कोणया देशात करण्यात आले होते ?
१) जर्मनी २) केनिया ३) कॅनडा ४) भारत

८५. नुकतेच चर्चेत असणारे बग्राम एअर फिल्ड (Bagram airfield) कोणत्या देशात आहे ?
१) पाकिस्तान २) अफगाणिस्तान ३) इराण ४) इराक

८६. एका सांकेतिक भाषेत
Dugo hui mul zo म्हणजे work is very hard
Hui dugo ba ki म्हणजे Bingo is very smart
Nano mul dugo म्हणजे cake is hard
Mul ki gul म्हणजे smart and hard
तर BINGO म्हणजे काय ते सांगा.
१) jalu २) Dugo ३) ki ४) Ba

८७. एका विद्यार्थ्याला पास होण्यासाठी एकूण गुणांच्या ३३% गुण मिळविणे आवश्यक आहे. त्याला परिक्षेत १२५ गुण मिळाले व तो ४० गुणांनी नापास झाला तर परीक्षा एकूण किती गुणांची होती ?
१) ५०० २) ६०० ३) ८०० ४) १०००

८८. मुनगटीवार यांनी बाग संरक्षक जाळया रु. ९१५२ ला खरेदी केल्या. खरेदीपूर्वी मुनगटीवार यांना छापील किमतीवर १२% सूट मिळाली. सूट वजा जाता उरलेल्या रकमेवर त्यांना ४ % केंद्रीय विक्रीकर घ्यावा लागला. तर त्या वृक्ष संरक्षक जाळयांची छापील किंमत किती होती ?
१) १०००० रु २) २०००० रु. ३) ३०००० रु ४) ४०००० रु

८९. जर मी एका क्रमांकाला १५ ने गुणले तर येणारे उत्तर त्या क्रमांकापेक्षा १९६ ने जास्त येते तर X ची किंमत शोधा
१) १४ २) २० ३) २६ ४) २८

९०. एका रकमेचे दोन वर्षाचे सरळ व्याज ८०० रु. व चक्रवाढ व्याज ८६० रु. येते तर दर व मुद्दल शोधा.
१) २०% २६६६.६६ रु २) १५% २६६६.६६ रु. ३) १५% २६६० रु ४) २१% २६६६.६६ रु

९१. दर तीन वर्षानी जन्मलेल्या ५ मुलींच्या वयाची बेरीज ५० वर्षे आहे तर सर्वात लहान मुलीचे वय काय ?
१) ४ वर्ष २) ८ वर्षे ३) १० वर्षे ४) वरीलपैकी नाही

९२. अरुणाला ३०km अंतर कापण्यासाठी अनिलपेक्षा २ तास जास्त लागतील. जर अरुण ने त्याचा वेग दुप्पट केला तर त्याला अनिलपेक्षा १ तास कमी लागेल तर अरुणचा वेग काय ?
१) ८ kmph २) ४ kmph ३) ५ kmph ४) ७ kmph

९३. आगगाडीत बसलेल्या माणसाला एका मिनिटात २१ खांब आगगाडीने पार केले असे दिसतात व दोन खांबातील अंतर ५० मीटर असेल तर आगगाडीचा वेग काय ?
१) ६१ kmph २) ५६ kmph ३) ६३ kmph ४) ६० kmph

९४. एका दकानदार रु. १३.५० कि.ग्रॅ. ची ८० कि.ग्रॅ. साखर व रु. १६ कि.ग्रॅ. दराची १२० कि.ग्रॅ. साखर एकत्र करतो, तर ते साखर त्याने काय दराने विकावी म्हणजे त्याला २०% नफा होईल ?
१) १६ रु. कि.ग्रॅ. २) १७ रु. कि.ग्रॅ. ३) १८ रु. कि.ग्रॅ. ४) १९ रु. कि.ग्रॅ.

www.spandancareers.org

९५. योग्य अनुमान ओळखा

विधान : अ) सर्व इमारत खडू आहेत

ब) कोणताही खडू चॉकलेट नाही

अनुमान अ) कोणतीही इमारत चॉकलेट नाही

ब) सर्व खडू इमारत आहेत

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ    २) फक्त ब    ३) दोन्ही नाही    ४) दोन्ही बरोबर

---

९६. मागील वर्षी एका शाळेत ५०० विद्यार्थी होते, त्यात ३२० मुले आणि १८० मुली होत्या. या वर्षी विद्यार्थी संख्या कायम असून २८० मुले आणि २२० मुली आहेत. तर मुले आणि मुली यांच्या संख्येत शेकडा किती वाढ किंवा घट होईल ?

१) मुले ८% घट, मुली ८% वाढ    २) मुले ८% घट, मुली १०% वाढ

३) मुले 12% घट, मुली १०% वाढ    ४) मुले १०% घट, मुली ८% वाढ

---

९७. $X^2$-mx + 7 च्या बहुपदीची किंमत X = 2 असतांना ३५ असेल, तर m =?

१) १.२    २) — १२    ३) १०    ४) ११

---

९८. एक व्यक्ती १२ कि.मी उत्तरेकडे गेला, नंतर १५ कि.मी. पूर्वेला, त्यांनंतर १६ कि.मी. पश्चिमेला व त्यानंतर १५ कि.मी. दक्षिणेला तर सुरुवातीच्या टोकापासून तो किती दूर आहे ?

१) ५ कि.मी.    २) ९ कि.मी.    ३) ३७ कि.मी.    ४) ६१ कि.मी.

---

९९. P = ( 40 % चे A) + ( B चे 65%) आणि


Q = ( 50 % चे A) + ( B चे 50%) आणि

A > B तर खालीपैकी कोणते विधान अचूक असेल ?

६१) P > Q    २) Q > P    ३) P = Q    ४) हयापैकी नाही

---

१००. खालील आकृतीत एकूण आयात किती



पर्यायी उत्तरे

१) ८    २) १८    ३) १७    ४) २०

www.spandancareers.org